स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १३ ऑक्टोबर, २०२२

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत तर्कशास्त्र कौशल्य या विषयावर आज गुरुवार दि.१३ ऑक्टोबर रोजी विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेण्यात आली.

प्रोजेक्ट जेनेसिस, इन्फोसिस बीपीएम पुणे येथील प्रशिक्षण घेतलेल्या केसीईएस संस्थेच्या डॉ. तनुजा फेगडे यांनी कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी तार्किक तर्क आणि परिणामकारक क्षमता कशी सुधारावी याबाबत मार्गदर्शन करुन तर्कशास्त्रामध्ये कोडींग, दिशा संवेदना, संख्यामालिका, चिन्हे, कोडे-तुलना, निवड इत्यादी बाबत सोपे उदाहरणे दिली. यावेळी विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक डॉ.रमेश सरदार, प्लेसमेंट ऑफीसर सोनाली दायमा उपस्थित होते. आभार विद्यार्थी कृष्णा चौधरी याने मानले.

**बातमी क्र.२**

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी ) ऑरलीकॉन बालज्सर कोटींग थायलंड कंपनी लि., ग्लोबल रिसर्च अॅन्ड ट्रेनिंग फोरम व्यवस्था पुणे आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने बँकॉक, थायलंड येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही आंतरराष्ट्रीय परिषद १४ ते १७ ऑक्टोबर या कालावधीत होणार असून विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी हे ऑनलाईन तर डॉ.विजय सरस्वती (कुलगुरु, एस.एम.यु. ऑस्ट्रेलिया) हे उद्घाटन सत्रात उपस्थित राहणार आहेत. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे हे उद्घाटन व पॅनल डिक्सशन सत्रासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहतील. १६ ऑक्टोबर रोजी व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेचे प्रा.समीर नारखेडे हे ऑनलाईन बीजभाषण देणार असून डॉ.रमेश सरदार व डॉ.पवित्रा पाटील हे सत्र अध्यक्ष असतील. समारोप प्रसंगी संचालक प्रा.मधुलिका सोनवणे या असतील. प्रशाळेतील डॉ.आर.आर.चव्हाण व डॉ.अतुल बारेकर हे प्रत्यक्ष परिषदेत सहभागी होत आहेत. या परिषदेत ऑस्ट्रेलिया, बांग्लादेश, भारत, थायलंड या देशातील प्राध्यापक, संशोधक, औद्योगिक क्षेत्रातील व्यक्ती ऑफलाईन / ऑनलाईन उपस्थित राहतील व शोधनिबंध सादर करतील अशी माहिती परीषदेचे संचालक रतीकांत रे व परिषद समन्वयक डॉ.आर.आर.चव्हाण यांच्यातर्फे देण्यात आली आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी